**<u>कुलाबा- वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिका</u>**

**<u>ब्लू स्टार लिमिटेड समूह  करणार मुंबई मेट्रो -३ च्या वायू विजन पर्यावरण नियंत्रण प्रणाली यंत्रणेचे काम</u>**

**<u>मुंबई १९ जून २०१९:</u>** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ) कुलाबा- वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गिकेअंतर्गत टप्पा-२ च्या बीकेसी ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकांच्या वायू विजन (टनेल व्हेंटिलेशन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणाली) यंत्रणेच्या उभारणीसाठी  "ब्लू स्टार लिमिटेड समूह "ची निवड करण्यात आली आहे. ही निवड आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे जायकाच्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आली आहे.

"ब्लू स्टार लिमिटेड समूह" मेट्रो-३ च्या बीकेसी ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकांदरम्यानच्या वायू विजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणाली यंत्रणेचे काम करणार आहेत ज्यामध्ये संपूर्ण यंत्रणेचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग इत्यादी कामांचा समावेश राहील.

वायू विजन यंत्रणा (टीव्हीएस) ही महत्वपूर्ण यंत्रणा आहे त्यामुळे बोगद्यातील हवेचे तापमान नियंत्रीत ठेवण्यास मदत होते तसेच आपत्कालिन परिस्थितीत आग व धुराचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने केले जाते.

पर्यावरण नियंत्रण प्रणाली यंत्रणेद्वारे प्रवाशांना ताजी हवा मिळणे शक्य होणार आहे व आपत्कालीन परिस्थितीत धुराच्या निर्गमनासाठी देखील या यंत्रणेचा वापर होणार आहे.

मुं.मे.रे.कॉ. च्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या, " मेट्रो-३ प्रकल्पसाठी तांत्रिकदृष्ट्या अद्यावत वायू व्हिजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणालीची उभारणी करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यामुळे मुंबईकरांना आरामदायी व सुरक्षितरित्या प्रवास करणे शक्य होणार आहे "